दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
मुख्य संपादक : अजय भांगे

बीड/महाराष्ट्र | शनिवार दि.७ डिसेंबर २०२४ | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष २ रे | अंक-१०२ | पाने ४ | किंमत ४ रुपये

## आता लाडक्या बहिणींसाठी नाही,तर सगळ्या घटकांसाठी काम करावे-इम्तियाज जलील

**छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)**-देवेंद्र फडणवीस राज्याचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेणार आहेत. एमआयएमचे नेते आणि माजी खासदार इम्तियाज जलील यांनी फडणवीसांना शुभेच्छा दिल्या आहेत. मी देवेंद्र फडणवीसांचे अभिनंदन करतो, आता त्यांनी महाराष्ट्राच्या हितासाठी काम करावे, असे इम्तियाज जलील म्हणाले. फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजपचे १३२ आमदार निवडून आले आहेत, ते कसे आलेत हे सगळ्यांना माहित आहे, असे म्हणत टोलाही लगावला. महाराष्ट्राचे २१ मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीसांचा शपथविधी होणार आहे. एकनाथ शिंदे आणि अजित पवार देखील उपमुख्यमंत्रिपदाची शपथ ग्रहण करणार आहेत. यासाठी अनेक नेत्यांकडून त्यांना शुभेच्छा देण्यात आहेत. इम्तियाज जलील यांनी देवेंद्र फडणवीसांना शपथविधीसाठी शुभेच्छा दिल्या. देवेंद्र फडणवीसांनी आता फक्त लाडक्या बहिणींसाठी नाही, तर लाडके भाऊ, लाडके शेतकरी, लाडके बेरोजगार या सगळ्यांसाठी काम करावे, असा चिमटा इम्तियाज जलील यांनी काढला. महाराष्ट्रात महायुती बहुमताने जिंकली. एकट्या भाजपने फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली १३२ आमदार निवडून आणले, ते कसे आले हे वेगळे सांगण्याची गरज नाही, असा टोलाही त्यांनी लगावला.

# निकषातील लाडक्या बहिणींनाच मिळतील २१०० रु.- फडणवीस

## आधी आर्थिक स्त्रोताची व्यवस्था करून रक्कम वाढवण्याचा दावा

**मुंबई (वृत्तसंस्था)-मुख्यमंत्रिपदाची सूत्रे हाती घेताच देवेंद्र फडणवीस यांनी लाडकी बहीण योजनेविषयी महत्त्वाची घोषणा केली. महायुतीच्या जाहीरनाम्यात लाडक्या बहिणींना १५०० ऐवजी २१०० रुपये देण्याचे आश्वासन नमूद होते. त्याविषयी मंत्रालय पत्रकार संघाच्या पत्रकार परिषदेत ते म्हणाले की, निकषात बसणाऱ्यांनाच २१०० रुपये मिळतील. ही वाढीव रक्कम नेमकी कधीपासून महिलांच्या खात्यात जमा होईल, या प्रश्नावर त्यांनी 'आधी आर्थिक स्त्रोताची व्यवस्था करून रक्कम वाढवू' असा दावा केला.फडणवीसांनी सांगितले की, शेतकरी सन्मान योजना जेव्हा सुरू केली तेव्हा अनेक सधन शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळाला होता. मात्र, सरकारच्या आवाहनानंतर सधन शेतकऱ्यांनी तो लाभ सोडला होता. मग ही योजना स्थिर झाली. त्याप्रमाणेच लाडकी बहीण योजनाही स्थिर होईल. मात्र, या योजनेत काही लाडक्या बहिणी निकषाच्या बाहेर असतील त्यावर विचार करू.**



विरोधकांकडे नियमानुसार अपेक्षित संख्याबळ नसले तरी मविआतर्फे विरोधी पक्षनेतेपदावर दावा केला जाणार आहे, असे निदर्शनास आणून दिले असता फडणवीस म्हणाले की, विरोधी पक्षनेता निवडीचा अधिकार सभागृहाच्या अध्यक्षांचा असतो. तो सरकारचा निर्णय नसतो. त्यामुळे अध्यक्ष जो निर्णय घेतील तो आम्हाला मान्य राहील. लोकसभेतही १० वर्षे विरोधी पक्षनेतेपद नव्हते तरीदेखील जो सर्वात मोठ्या पक्षाचा नेता होता त्याला लोकसभेने विरोधी पक्षनेत्याप्रमाणे सगळे अधिकार दिले होते. त्याचप्रमाणे विधानसभा अध्यक्षांनी निर्णय घेतला तर तोही मान्य असेल.या योजनांवर भर देऊ : १. पायाभूत सुविधा, २. १६ हजार मेगावॅटची सौरऊर्जा निर्मिती, ३. नदीजोड प्रकल्प, ४. जलयुक्त शिवार या योजनांवर भर देऊन मुलींना १०० टक्के शैक्षणिक शुल्क देण्याचा प्रयत्न असेल. निवडणुकीच्या पूर्वी महायुतीने दिलेल्या वचननाम्यातील सर्व आश्वासने आम्ही पूर्ण करू, असेही फडणवीस यांनी सांगितले.नागपूर ते गोवा शक्तिपीठ मार्गाला सांगली जिल्ह्यापर्यंत समर्थन, तर कोल्हापूर जिल्ह्यात विरोध आहे. शेतकऱ्यांचा विरोध पत्करून आणि त्यांच्या जमिनी घेऊन विकास करण्याची मानसिकता आमची नाही. त्यामुळे चर्चेतून मार्ग काढू. समृद्धीमुळे जसे मराठवाड्यातील चित्र बदलले तसेच शक्तिपीठमुळे अनेक भागांचे चित्र बदलेल, असे सांगत फडणवीस म्हणाले की, शक्ती कायद्यातील काही तरतुदींसंदर्भात सुप्रीम कोर्टाने काही विसंगत निर्णय दिले. यानंतर केंद्र सरकारने तीन कायदे आणले. त्यात आपले कायदे विसंगत होताहेत. त्यामुळे केंद्र सरकारशी बोलणी करू.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही पत्रकार परिषद घेऊन मोदी, शाहांचे आभार मानले. ते म्हणाले की, मी सीएम असताना स्वत:ला कॉमन मॅन समजत होतो. आता मी डीसीएम म्हणजे डेडिकेटेड टू कॉमन मॅन झालो आहे. सामान्य माणसाच्या सेवेसाठी समर्पित झाला आहे. मला सीएम असताना फडणवीसांनी जसे सहकार्य केले तसेच मी त्यांना करणार करणार आहे, असा दावाही शिंदेंनी केला.

## खळबळजनक:स्वाराती रुग्णालयास बनावट औषधींचा पुरवठा;ठाणे,गुजरात मधील चौघांवर गुन्हा

**अंबाजोगाई | परवेज पटेल**

अंबाजोगाई - गोरगरीब रुग्णांवरील उपचारासाठी आधारस्थान असलेल्या अंबाजोगाईच्या स्वाराती रुग्णालयास बनावट औषधींचा पुरवठा करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी ठाणे आणि सुरत (गुजरात) मधील चौघांवर गुन्हा दाखल झाला आहे सध्याच्या खाजगी रुग्णालयातून मिळणाऱ्या महागड्या उपचारपद्धतीमुळे गोरगरीब आणि सर्वसामान्य रुग्ण स्वस्त आणि खात्रीपूर्वक उपचारासाठी स्वाराती रुग्णालयास प्राधान्य देतात एका अर्थाने हे रुग्णालय गोरगरिबांसाठी जीवनवाहिनी आहे मात्र या रुग्णालयात महाराष्ट्र शासनाने नेमलेल्या औषध पुरवठा कंत्राटदाराने बनावट औषधीचा पुरवठा केल्याचे अन्न व औषध प्रशासनाच्या तपासणीत उघड झाले आहे या प्रकरणी




औषधी निरिक्षक मनोज पैठणे यांच्या फिर्यादीवरून सुरेश दत्तात्रय पाटील, मिहीर त्रिवेदी (रा. भिवंडी, जि.ठाणे),द्विती सुमित त्रिवेदी (रा. सुरत) आणि विजय शैलेद्र चौधरी (रा. मिरा रोड ठाणे) या चौघांवर अंबाजोगाई शहर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर बनावट औषध निर्मिती आणि विक्रीच्या मागे आंतरराज्यीय टोळी असून अनेक राज्यात त्यांचे जाळे पसरले असण्याची शक्यता देखील फिर्यादीत व्यक्त करण्यात आली आहे. पुढील तपास एपीआय कांबळे करत आहेत.

## कुत्र्यांनी पाडला हरणाचा फडशा,अफवा मात्र बिबट्याची

**अंबाजोगाई | परवेज पटेल**

अंबाजोगाई तालुक्यात एक खळबळजनक घटना पुन्हा समोर आली आहे मौजे कुंबेफळ गावात एका हरणाचा फडशा पाडल्याची घटना उघडकीस आली आहे. दरम्यान, मृत पावलेल्या हरणाचा फडशा बिबट्याने पाडला की, अन्य मोकाट जनावराने या बद्दल तर्कवितर्क लढविले जात आहेत या संदर्भात वनाधिकारी विजया शिंगाटे यांच्याशी बातचीत केली असता त्यांनी 'त्या' हरणाचा फडशा मोकाट कुत्र्याने पाडला असल्याची माहिती दिली आहे. अंबाजोगाई शहरापासून जवळ असलेल्या माकेगाव गावात काही दिवसांपूर्वी बिबट्याने बैलाचा फडशा पाडल्याची घटना घडली होती या घटनेमुळे परिसरातील ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले



आहे. या बिबट्याच्या भीतीने शेतकरी शेतात जाण्यासाठी देखील घाबरत आहेत अशातच अंबाजोगाई शहरापासून जवळ असलेल्या कुंबेफळ गावात एका हरणाचा फडशा पाडल्याची घटना उघडकीस आली. त्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. या घटनेमुळे कुंबेफळ परिसरातील ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. परंतू, 'त्या' हरणाचा फडशा मोकाट कुत्र्याने पाडला असल्याची माहिती वनविभागाकडून देण्यात आली आहे. अंबाजोगाई परिसरात बिबट्याचा वावर दिसून आल्यानंतर सोशल मीडियावर या घटनेच्या अनुषंगाने इतरत्र ठिकाणचे जुने बिबट्याचे व्हिडीओ शेअर केले जात असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे कोणीही अशा अफवा किंवा व्हिडीओ शेअर करून नयेत, असे आवाहन वनविभागाकडून करण्यात आले आहे

## पवनराजे इंग्लिश स्कूल केज येथे महापरिनिर्वाणदिनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन






**केज | प्रतिनिधी**

पवनराजे इंग्लिश स्कूल तथा कै.राम चौरे प्राथ. माध्य. व उच्चमाध्यमिक विद्यालय केज येथे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनी विद्यार्थी तथा शिक्षकांच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

या बाबत वृत्त असे कि केज तालुकात तथा शहरामध्ये इंग्लिश माध्यमांची शाळा म्हणून प्रसिद्ध असलेली पवनराजे इंग्लिश स्कूल केज येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमाचे अध्यक्ष पवनराजे इंग्लिश स्कूल तथा कै.राम चौरे प्राथ. माध्य व उच्च माध्यमिक विद्यालयाचे अध्यक्ष खंडेराव चौरे हे तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रिन्सिंपल अशोक मस्के , घुले सर, दळवी मॅडम हे होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले . पवनराजे इंग्लिश स्कूल मधील इयत्ता १० वी व ९ वीच्या विद्यार्थिनी कु.भक्ति भांगे , म्हणून कु.अंतिमा खंडेलवाल, कु.अंजली बनसोड,कु.पुजा घुले, कु.श्रुती ढाकणे,कु.श्रद्धा ढाकणे, कु.अश्विनी जाधव यांनी तर प्रमुख पाहुणे म्हणुन प्रिन्सिंपल अशोक मस्के , घुले सर, दळवी मॅडम यांनी आपले मनोगत व्यक्त केली तर अध्यक्षीय समारोपात अध्यक्ष खंडेराव चौरे सर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आत्मसात केल्यानंतर खरा माणुस घडतो असे आपले विचार व्यक्त केले.

सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अजय भांगे सर यांनी केले तर आभार डी.एस. चौरे सर यांनी मानले या कार्यक्रमास दळवी मॅडम ,सिद्धार्थ शिंनगारे सर, घुले पाटील सर , भांगे सर, आदि शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी तथा मोठया संख्येने विद्यार्थी उपास्थित होते.

## देवेंद्रजींचे जीवन संघर्षाने भरलेले:ते मुख्यमंत्री होण्याचा आनंद,पण जबाबदारीही वाढणार

**मुंबई (वृत्तसंस्था)**-देवेंद्रजी सहाव्यांदा आमदार झाले आणि आता तिसऱ्यांदा मुख्यमंत्री पदाची शपथ घेत आहेत. ही खूप आनंदाची गोष्ट आहे, पण त्यासोबतच खूप जबाबदारीही त्यांच्यावर आहे, अशी प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीसांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी दिली. देवेंद्रजींच्या मेहनतीला यश मिळाल्याचा मला आनंद आहे. महायुती आता एकत्रित आहे. महायुतीने महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी वाटचाल चालू केलेली असल्याचे त्या म्हणाल्या.

देवेंद्र फडणवीस यांचे जीवन संघर्षमय राहिलेले आहे. त्यांनी मोठा संघर्षाचा काळा पाहिलेला आहे. त्यांनी काही करायचे ठरवले, तर ते करून दाखवतात. जिद्द आणि चिकाटीमुळे देवेंद्रजी आज या ठिकाणी आहे. देवेंद्रजींना महाराष्ट्रासाठी बरीच कामे करायची आहे. आपल्या सर्वांना त्यांना साथ देण्याची जबाबदारी आपल्यावर आहे, असे अमृता फडणवीस म्हणाल्या.




लाडकी बहीण योजना एक चांगला प्रकल्प आहे. साऱ्या बहिणी देवेंद्र फडणवीस आणि महायुतीसोबत जोडल्या गेल्या. संसदेत आणि राजकारणात महिलांचे प्रमाण अधिक असावे यासाठी बिल मंजूर झाले आहे, लवकरच त्याची अंमलबजावणी केली जाईल, असे अमृता फडणवीस म्हणाल्या.देवेंद्र फडणवीसांवर त्यांच्या मी पुन्हा येईन या विधानावरून विरोधकांनी टीका केली होती. यावरही अमृता फडणवीसांनी भाष्य केले. आपल्याला काही प्राप्त करायचे तेव्हा आपल्याला अर्जुनासारखे एकच लक्ष असले पाहिजे. ते पुन्हा येतील याबाबत लोकांना आणि देवेंद्रजींना विश्वास होता. देवेंद्रजी महाराष्ट्रासाठी जे काही करू शकतील, ते इतर कुणीही करू शकणार नाही. या विश्वासामुळे ते पुन्हा आलेले आहेत, असे अमृता म्हणाल्या.देवेंद्र फडणवीस यांची मेहनत, दूरदृष्टी आणि व्हिजन पाहून त्यांना पुन्हा यायचे होते, असे अमृता फडणवीस म्हणाल्या. बहिणींसाठी, शहरांच्या इन्फ्रास्ट्रक्चरसाठी, शेतकऱ्यांसाठी त्यांना पुन्हा यायचे होते. अधिक गुंतवणूक, परकीय गुंतवणूक यातील काम पाहून ते पुन्हा येतील असे वाटले होते, असेही अमृता फडणवीस म्हणाल्या.

२३ नोव्हेंबर रोजी निकाल लागल्यानंतर मी देवेंद्रजींना मुख्यमंत्री पद भेटेल की नाही याबाबत विचार केला नव्हता. त्यांनी आपल्या कामाचे चीज करून दाखवले. पक्षश्रेष्ठींच्या म्हणण्यानुसार त्यांना कोणतेही पद मिळाले असते, तरी त्यांनी लोकसेवाच केली असती, असे अमृता फडणवीस म्हणाल्यात.२०१९ मध्ये भाजपसोबत धोका झाला होता तेव्हा पलट के आऊंगी शाखों पे खुशबुएँ लेकर, खिजां की जद में हूँ मौसम जरा बदलने दे, असे ट्वीट केले होते. आज तो मौसम बदलला आहे. आम्ही त्या परिस्थितीतूनही अव्वल क्रमांकाने बाहेर पडलो आहोत, असे म्हणत अमृता फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर नाव न घेता टीका केली.

## शाहू महाराजांना बाजूला सारणे खपवून घेणार नाही:शपथ विधीच्या जाहिरातीवरून संभाजीराजे यांचा भाजपला इशारा

**कोल्हापूर (वृत्तसंस्था)**-महायुती सरकारचा शपथविधी सोहळा आज सायंकाळी ५ वाजता होणार आहे. मुंबईतील आझाद मैदानावर या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. भाजपने या सोहळ्याच्या निमंत्रणाची जाहिरात सर्वच प्रमुख वृत्तपत्रात दिली आहे. मात्र, या जाहिरातीमध्ये शाहू महाराजांचा फोटो नसल्याने छत्रपती संभाजीराजे यांनी भाजपवर निशाणा साधला आहे. शाहू महाराजांना बाजूला सारणे, ही गोष्ट आम्ही खपवून घेणार नाही. भाजपने ही चूक दुरुस्त करावी, असा इशारा संभाजीराजे छत्रपती यांनी दिला आहे.भाजपने दिलेल्या जाहिरातीमध्ये मोदी अमित शाह, जेपी नड्डा, चंद्रशेखर बावनकुळे, आशिष शेलार या भाजपच्या नेत्यांच्या फोटोसह एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांचेही फोटो छापले आहेत. तसेच छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीकारी बिरसा मुंडा, महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले आणि अहिल्यादेवी होळकर या महापुरुषांचे फोटो छापण्यात आले आहेत. निवडणूक प्रचारात भाजपकडून बाळासाहेब ठाकरेंच्या नावाचा उल्लेख करण्यात आला होता. मात्र, या जाहिरातील बाळासाहेब ठाकरे तसेच शाहू महाराजांना स्थान देण्यात आले नाही. यावरून संभाजीराजे छत्रपती यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे.संभाजीराजे छत्रपती म्हणाले की, शपथविधी सोहळ्यासाठी जाहिरातीमध्ये महापुरुषांचे फोटो छापले. मात्र, शाहू महाराजांचा फोटो छापला नाही, हे दुर्दैव आहे. महाराष्ट्राला घडवण्यामध्ये शाहू, फुले, आंबेडकरांचे मोठे योगदान आहे. शाहू महाराजांना बाजूला करून जी जाहिरात दिली ती चालणार नाही, ही गोष्ट महाराष्ट्राला पटणारी नाही. शाहू महाराजांना बाजूला सारणे, ही बाब आम्ही खपवून घेणार नाही. भाजपने ही चूक दुरुस्त करावी, असा इशारा त्यांनी दिला.संभाजीराजे छत्रपती यांनी ईव्हीमएमवर सुरू असलेल्या वादावरही भाष्य केल



संपादकीय

# पाच वर्तुळांचा सांगावा



जगातील सर्वांत मोठा क्रीडा महोत्सव म्हणून ओळख असलेल्या ऑलिम्पिक स्पर्धेला शुक्रवारी मध्यरात्री पॅरिसमध्ये प्रारंभ झालेला असेल. तब्बल शंभर वर्षांनी पुन्हा एकदा पॅरिसमध्ये होत असलेली स्पर्धा अनेक अर्थाने वेगळी असणार आहे. आधुनिक ऑलिम्पिक स्पर्धांचे पुनरुज्जीवन झाले, त्याला आता सव्वाशेहून अधिक वर्षे झाली. प्रारंभी पॅरिसने दोन वेळा या स्पर्धांचे यजमानपद भूषविले होते. त्यानंतर आता तब्बल एका शतकाच्या अंतराने पुन्हा एकदा फ्रान्सच्या भूमीवर जगातील सर्वच देशांतील युवक आपले क्रीडाकौशल्य पणाला लावणार आहेत. त्याचबरोबर, लंडनपाठोपाठ ही स्पर्धा तिसऱ्यांदा भरविणारे तिसरे शहर म्हणून पॅरिसची नोंद इतिहासात केली जाईल. आत्ताच्या काळात ऑलिम्पिक स्पर्धा भरविणे हे फक्त क्रीडा क्षेत्रासाठी महत्त्वाचे नसते, तर संपूर्ण देशाच्या अर्थव्यवस्थेला एक नवे वळण देण्याची ताकद या स्पर्धांमध्ये असते.

पॅरिसची ही स्पर्धाही त्याला अपवाद नसेल. अर्थात लंडन आणि टोकियोमध्ये झालेल्या स्पर्धांच्या तुलनेमध्ये पॅरिसच्या आयोजनावर कमी – म्हणजे साधारण सोळा अब्ज डॉलर खर्च केला जाणार आहे. लंडनमध्ये हा खर्च साडेबावीस अब्ज डॉलरपर्यंत गेला होता. एवढा निधी खर्च करणे खरोखरच आवश्यक होते का, अशी टीकाही केली गेली. गेल्या स्पर्धेला करोनाच्या ग्रहणाने ग्रासले होते. आता मात्र कोणत्याही सावटाशिवाय ही स्पर्धा होणार आहे. फ्रान्समध्ये ही स्पर्धा होत असताना त्यांच्यापुढे सर्वांत मोठे आव्हान हे आर्थिक गोष्टींपेक्षा या निमित्ताने जगभरातून येणारे दहा हजाराहून अधिक खेळाडू, पंच, संघटक व पत्रकार यांच्या सुरक्षेचे असणार आहे. गेल्या काही वर्षांत या शहराने अनेक दहशतवादी कारवायांचा सामना केला आहे. त्यामुळे या स्पर्धेच्या दरम्यान कोणतीही अनुचित घटना होऊ नये यासाठी फ्रेंच सरकारने ब्रिटनपासून ते सौदीपर्यंतच्या अनेक देशांशी करार करून सुरक्षाव्यवस्थेसाठी त्यांचे सहकार्य घेतले आहे. एखाद्या आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी असे सहकार्य घेतले जाण्याची ही बहुधा पहिलीच वेळ असावी. पॅरिसमधील सोळा वेगवेगळ्या ठिकाणी या स्पर्धा होणार आहेत. त्यातील बहुसंख्य स्टेडियम जुनी असून, या स्पर्धेच्या निमित्ताने त्यांचे डागडुजी करण्यात आली आहे. स्पर्धेसाठी क्रीडानगरी मात्र नव्याने उभी करण्यात आली आहे. या स्पर्धेच्या निमित्ताने पॅरिसमधील वाहतूक व्यवस्थेमध्ये आमूलाग्र बदल करण्यात आले आहेत. मेट्रोच्या जाळ्यामध्ये वाढ करण्यात आली आहे; त्याचप्रमाणे शहरभर सायकल ट्रॅकचे जाळे तयार करण्यात आले आहे. त्याचा भार येणाऱ्या पाहुण्यांकडून वसूल करण्याचाही प्रयत्न आहे. त्यामुळे मेट्रोचे भाडे दुप्पट केले गेले आहे. पॅरिस हे जगातील कलासक्त शहर समजले जाते. विविध देशांतील, धर्मातील कलावंत या नगरीने आपल्याला स्वीकारावे यासाठी धडपड करताना दिसतात. आपल्या या कलाप्रेमाचे प्रतिबिंब या स्पर्धेच्या प्रारंभी होणाऱ्या समारंभात दिसावे, यासाठी संयोजकांची धडपड आहे.

या शतकाच्या शेवटपर्यंत ऑलिम्पिक स्पर्धा या भारताच्या दृष्टीने फक्त हजेरी लावण्याच्या स्पर्धा असत. हॉकीमधील काही सांघिक सुवर्णपदके सोडली तर नॉर्मन प्रिचर्ड यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात मिळविलेली दोन रौप्यपदके व त्यानंतर महाराष्ट्राच्या खाशाबा जाधव यांनी कुस्तीत मिळविलेले ब्राँझपदक एवढीच भारताची कमाई होती. अटलांटामध्ये लिएण्डर पेसने टेनिसमध्ये ब्राँझपदक मिळविताना भारतीय खेळाडू वैयक्तिक पदके मिळवू शकतात हे पुन्हा एकदा जगाला दाखवून दिले. त्यानंतर सातत्याने प्रत्येक स्पर्धेमध्ये भारतीय खेळाडू ऑलिम्पिकमध्ये पदके मिळविण्यात यशस्वी होत आहेत. अर्थात हे यश त्या खेळाडूंच्या मेहनतीचे आहेच; पण त्याचबरोबर भारतामध्ये क्रिकेटव्यतिरिक्तही इतर खेळ आहेत याची जाणीव झालेले सरकार आणि इतर प्रायोजकांनाही त्याचे श्रेय जाते. त्यांनी आपली ताकद या खेळाडूंच्या मागे उभी केली म्हणून भारत गेल्या पंचवीस वर्षांमध्ये पदकतक्त्यांमध्ये दिसू लागला आहे. अर्थात १४० कोटी लोकसंख्या असलेला देश व जगातील चौथ्या क्रमांकाची आर्थिक सत्ता असलेल्या भारताला यामध्ये आणखी खूप प्रगती करायची आहे. यंदाच्या स्पर्धेमध्ये भारताचे एकशे बारा खेळाडूंचे पथक सहभागी होत आहे. भारताला नेमबाजी, बॅडमिंटन, कुस्तीमधून पदकांच्या अपेक्षा आहेतच; पण त्याचबरोबर पुन्हा एकदा हॉकीमध्येही यशाला गवसणी घालण्याची भारताची धडपड असेल. त्याचबरोबर गेल्या स्पर्धेमध्ये सुवर्णवेध घेणाऱ्या नीरज चोप्राकडूनही भारताला सुवर्णपदकाची अपेक्षा असेल. अर्थात ऑलिंपिकच्या ब्रीदवाक्यानुसार, जिंकण्यापेक्षा सहभाग महत्त्वाचा. भारताने अनेक वर्षे हे ब्रीद अगदी मनापासून स्वीकारले होते. गेल्या काही वर्षांत बदललेल्या मानसिकतेमुळे आता नव्या भारतातील खेळाडू या स्पर्धेत काय कमाल करतात हे बघू या.

# नवे संकल्प आणि नवीन वक्ते!

राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेतूनच अठराव्या लोकसभेच्या पुढील पाच वर्षांत संसदेच्या दोन्ही सभागृहांत सत्ताधारी व विरोधी पक्ष, या दोन्ही बाजूंची आक्रमकता वाढणार, हे स्पष्ट दिसू लागले होते. 'कुर्सी की पेटी बांध लीजिए, मौसम बिगड़ने वाला है..' असा इशारा मतपेटीतून मिळाल्याने, पुढची पाच वर्षे पडद्याआडून दोन्ही बाजूंनी संवाद सुरू राहिला नाही तर संघर्ष आणखी वाढेल; याचेही संकेत मिळाले होते. पण सध्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेल्या केंद्रीय अर्थसंकल्पावर जी सुरळीत चर्चा सुरू आहे, तो संसदेच्या त्रिकोणाकार वास्तूसाठीही सुखद धक्काच असणार! कदाचित म्हणूनच, इतक्या सुंदर इमारतीत या माणसांची इतकी कशाबद्दल चर्चा सुरू आहे, हे वरिष्ठ सभागृहात जाऊन पाहण्याचा मोह माणसाच्या एखाद्या पूर्वजालाही आवरता आला नसावा..

या अधिवेशनात पहिल्या आठवड्यात रोज सुरळीत सुरू असलेले प्रश्नोत्तर तास, शून्य प्रहर, खासगी सदस्यांची विधेयके हे दृश्य २००९ ते २०१४ आणि मागची काही वर्षे गायब झाले होते. ते चित्र पुन्हा अवतरले आहे. मात्र, अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे सपाट, एकसूरी अर्थसंकल्प वाचन, हलकेच डुलक्या घेणारे खासदार, अपवाद वगळता कंटाळवाणे अर्थसंकल्प सादरीकरण असे दृश्य होते. मात्र, सर्वपक्षीय नेते स्थितप्रज्ञ मनोवस्थेत गेल्याने त्यांनाही अर्थसंकल्प मांडताना गोंधळ झाला नाही, याचे श्रेय द्यावे लागेल. अर्थात, अर्थसंकल्पावरील सविस्तर चर्चेमधून अनेक नवीन वक्त्यांचा परिचय झाला. पी. चिदंबरम, कपिल सिबल, शशी थरूर, सुप्रिया सुळे, हरसिमरतकौर बादल, राममोहन नायडू, काकोली घोष दस्तीदार, कुमारी सेलजा, रजनी पाटील आदींची माहिती सर्वांना आहेच. पण अर्थसंकल्पासारख्या क्लिष्ट समजल्या जाणाऱ्या विषयावर नवे संसदीय वक्ते जगासमोर आले म्हणून ही चर्चा वेगळी ठरली.



ममता बॅनर्जी यांचे भाचे अभिषेक बॅनर्जी, सांगलीचे विशाल पाटील, विप्लव देव, दीपक प्रकाश, खासदार झालेल्या मूळच्या पत्रकार सागरिका घोष, पुण्याच्या मेधा कुलकर्णी यांच्यासारखे अनेक खासदार उत्तम संसदपटू बनू शकतात, हे या चर्चेमधून दिसून आले.

अभिषेक बॅनर्जी यांनी चर्चेची सुरुवात करुन भविष्यात आपण तृणमूल काँग्रेसचे नेतृत्व करण्यास सज्ज असल्याचा संदेश आत्येला दिला असावा. 'पन्नास वर्षांपूर्वीच्या आणीबाणीबद्दल कोणी बोलत असेल, तर तुम्ही गप्प. पण सध्याच्या मुद्द्यांवर बोललो की, वर्तमानावर बोला असे म्हणता. वा रे वा सर,..' असे लोकसभेच्या अध्यक्षांना सुनावणारे बॅनर्जी त्या दिवशी वेगळ्याच आक्रमक भूमिकेत दिसले. फर्ड्या इंग्रजीतून बोलणारे विशाल पाटील, वैष्णोदेवी व प्रयागराजपर्यंत विशेष रेल्वे हवीच असे ठणकावून सांगणाऱ्या इकरा हसन, सन २०२४ पेक्षा १९२० च्या दशकातील स्थिती कितीतरी बरी होती, असे सांगणाऱ्या सागरिका घोष असे अनेक वक्ते यावेळी दिसले. उत्तम तयारी करून कसे बोलावे, याचा वस्तुपाठ इतर अनेकांच्याही भाषणात होता. मेधा कुलकर्णी यांनी तर गुरुवारच्या दुपारी जणू रणरागिणीचे रूप धारण केले. महाराष्ट्राला इतके भरभरून मिळाले, पण यांना कावीळ झाली आहे, त्यांच्यावर इलाज करा, असे सांगत त्यांनी मराठीतून आकडेवारीची बरसात केली.

'अभी बहुत कुछ तोडना बाकी है,' अशी शासनकर्त्यांची मानसिकता असली तरी भारतासारख्या विशाल, बहुरंगी देशात अर्थसंकल्प हे विशुद्ध 'राजकीय स्टेटमेंट' असते, हा सात दशकांतील परिपाठ एकदम सोडायला गेले तर फटका हा बसणारच. सर्वसामान्य नागरिकांना अर्थकारणातील बारकाव्यांपेक्षा प्राप्तिकरात किती सूट मिळणार, आमच्या राज्याला काय मिळाले, कोणती नवी रेल्वेगाडी येणार याची जास्त उत्सुकता असते. यंदाच्या अर्थसंकल्पाच्या भाषणात रेल्वेचाही पुरेसा उल्लेख गायब! लोकानुनय (सध्याच्या भाषेत तुष्टीकरण) करू नका, पण आमचे बजेट लोकाभिमुख आहे, एवढे दाखवण्यापुरते निदान मांडणीत तरी दिसले का? आधीचा पावणेतीन तासांचा अर्थसंकल्पीय भाषण वाचनाचा विक्रम असताना, संरक्षण उत्पादनांची वाढती आत्मनिर्भरता यासारख्या तपशिलांनी भाषण थोडे लांबले असते तरी काय बिघडणार होते? या निमित्ताने २६ फेब्रुवारी २०१०चे एक दृश्य आठवते. अर्थमंत्री प्रणव मुखर्जी हात जोडून करत असलेली विनंती धुडकावून भाजप व इतरांनी अर्थसंकल्पीय भाषणावर बहिष्कार घातला. त्यानंतर भाजप नेत्यांनी सांगितले होते की यांच्या (यूपीए) बजेटचा पोकळपणा दुसऱ्याच दिवशी दिसतो. मात्र, सीतारामन यांच्या यंदाच्या भाषणाची रचनाच अशी होती की तेवढीही प्रतीक्षा करावी लागली नाही! 'हम दो, हमारे दो' वगळता इतर राज्यांबद्दल सापत्न भाव दाखवल्याचा मजबूत एक्का भाषण संपता संपता विरोधकांच्या हाती सरकारने जणू स्वतःहून सोपवला! महाराष्ट्राचा आवाज त्यातही बुलंद. कारण सीतारामन यांनी दीड तासाच्या भाषणात मुंबईचा आणि महाराष्ट्र राज्याचा नामोल्लेखही टाळला. असा फुलटॉस मिळाल्यावर कोणते विरोधक ती पर्वणी साधणार नाहीत? विधानसभेसाठी महाराष्ट्रातील विरोधकांना प्रचाराचे 'नॅरेटिव्ह' शोधण्यासाठीही डोके खाजवण्याचे कष्ट नकोत; असा विचार सरकारने केला असावा! महाराष्ट्राला इतके दिले, तितके दिले वगैरे नंतर सुरू झाले तरी रजनी पाटील म्हणाल्या त्याप्रमाणे ते सारे खुलासे, 'बूंद से गयी वो हौद से नही आती..' याच धर्तीचे ठरणार, हे उघड आहे.

# शब्दकळा–जांगळबुत्ता

कोणतीही भाषा बोलींच्या दागिन्यांनी मढली असते. ते कोंदण भाषेला अधिकाधिक समृद्ध करते. विदर्भ हा तसा मूळ मध्यप्रांतातील प्रदेश. मागील साठ वर्षांत पूर्व आणि पश्चिम विदर्भ भाषेसह महाराष्ट्राच्या संस्कृतीत बऱ्यापैकी एकरूप झाले. जांगळबुत्ता हा एक रंजक आणि व्यापक वैदर्भीय शब्द आहे. त्याला खूप जुना इतिहास आहे, असे नाही. खेडुतांच्या संवादातून तो पुढे आला असावा. कुणी त्याला जांगडगुत्ताही म्हणतात. जुगाड करून हित साधणे म्हणजे जांगळबुत्ता. म्हटले तर, इप्सित साध्य करण्यासाठी लढविलेली अफलातून शक्कल. या शब्दाला कलारसिकांपर्यंत पोहचविण्याचे बरेचसे श्रेय जाते, मिर्झा रफी अहमद बेग या ग्रामीण प्रतिभावंताला.


विनोदनिर्मिती साधताना खाडकन् भानावर आणण्यात मिर्झा वाकबगार. एका दूरचित्रवाहिनीवरील विनोदी मालिकेत वारंवार उल्लेख करून त्यांनी जांगळबुत्त्याला प्रसिद्धी, प्रतिष्ठा मिळवून दिली. याच नावाने त्यांची लोकप्रिय कविता आणि काव्यसंग्रहही आहे. अभिनेते मकरंद अनासपुरे आणि भारत गणेशपुरे यांनीही या शब्दाचा खुबीने उपयोग केला. तो रसिकांना चांगलाच भावला. शक्कल, तोडगा, युक्ती, क्लुप्ती, कल्पना किंवा उपाय अशा समानार्थी शब्दांचा ध्वनित सारांश म्हणजे जांगळबुत्ता. हा झाला सामान्य अर्थ. या सर्वांना सामावून घेत त्यापल्याड उरलेले किंचित डावपेच आणि बरेचकाही कारस्थान असा गर्भित गोषवाराही या शब्दाशी जुळला आहे. फायदा होवो की तोटा, 'जांगळबुत्ता झाला' म्हटले की संपले. दोन प्रेमिकांच्या गुजगोष्टी म्हणजे तिसऱ्यासाठी जांगळबुत्ताच.पेपर कठीण गेला की हमखास जांगळबुत्ता होतो. चिल्लर अभावी परताव्यास दुर्लक्ष केले तर बस वाहकाला प्रवाशाकडून 'माह्या जांगळबुत्ता कायले करता राजेहो' अशी तिरकस प्रतिक्रिया येऊ शकते. त्याचा अचूक गाभा शोधायचा झाल्यास ग्रामीण विदर्भाचा दौरा करावा लागेल. एवढा जांगळबुत्ता कायले करत बसले, मले फोन काऊन नाही केला? असे उद्गार तुमच्या कानी येतील, त्याक्षणी जांगळबुत्ताच्या कक्षा लोचा, लफडे किंवा झामलझामल करणे इथपर्यंत विस्तारून गेल्या असतील. आता या वैदर्भीय 'झामलझामल' ची नेमकी शब्दकळा शोधूया, पुढे केव्हातरी!

# वेळ द्या, नाते बांधा...

आपल्या कुटुंबातील सदस्यांची सगळे जण काळजी घेत असतात. मात्र, आपल्या कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्तींना म्हणजेच पालकांना गुणवत्तापूर्ण वेळ देणे हीसुद्धा त्यांची महत्त्वपूर्ण गरज असते. सहवास, स्पर्श व सकस, पारदर्शक संवादाने नात्यांचे साकव बांधले जातात व नाती जोपासलीही जातात. मात्र, आज घडाळ्याच्या काट्यांवर धावणारी कुटुंबे, आपल्या कुटुंबातील पालकांशी दैनंदिन स्तरावरील संवादास योग्य तो न्याय देऊ शकत नाहीत, हे चित्र ठळकपणे सर्वत्र दिसून येते. नोकरी-व्यवसायाच्या वेळा व उर्वरित वेळांत टीव्ही, सोशल मीडिया, मोबाइल यात रमलेल्या सदस्यांना, कुटुंबातील ज्येष्ठ सदस्यांच्या नेमक्या गरजांचा अनेकदा विसर पडतो; म्हणूनच आसाम सरकारने पालकांसाठी वेळ देण्याबाबत सुट्टीचा घेतलेला निर्णय महत्त्वाचा वाटतो.

आपल्या कुटुंबातील वयस्कर आई-वडिलांच्या मुलभूत गरजा (अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य व सुरक्षा) भागवल्या म्हणजे आपले कर्तव्य पार पडले, असे अनेकांना वाटते; परंतु वाढत्या वयातील आपल्या आई-वडिलांच्या या पलीकडेही काही गरजा असतात, याचे भान ठेवण्यास उद्युक्त करणारी एक घोषणा आसाम सरकारने नुकतीच केली आहे. आयुष्याला वळण लावणारे, सकस मूल्ये व चांगल्या संस्काराने आपल्या मनाची मशागत करणाऱ्या आई-वडिलांचे वय वाढत असताना त्यांना गुणवत्तापूर्ण वेळ देणे, त्यांच्याशी रोज संवाद साधणे, त्यांचे शांतपणे ऐकणे, त्यांच्या जवळ नुसते बसणे, स्पर्शातून त्यांना आश्वासक भावनिक आधार देणे ही गरज अधोरेखित करत ही घोषणा करण्यात आली आहे. आसाम राज्यातील सर्व शासकीय कर्मचाऱ्यांना सात ते नऊ नोव्हेंबर २०२४ रोजी 'विशेष सुट्टी' जाहीर करण्यात आली आहे. मुख्य म्हणजे, या तीन दिवसीय सुट्टीचा लाभ हा आपल्या पालकांसह गुणवत्तापूर्ण वेळ घालविण्यासाठी व्हावा, असा मोठा विचार या घोषणेमागे आहे. विशेष म्हणजे 'पालक' या व्याख्येत सासू -सासरे हे नातेही अंतर्भूत करण्यात आले आहे. अर्थातच ही विशेष सुट्टी पालकांसह 'एकत्र कुटुंबात' राहणाऱ्या मुला- मुलींकरीता जाहीर करण्यात आली आहे.

पल्या कुटुंबियांना गुणवत्तापूर्ण वेळ देणे म्हणजे काय तर, त्यांच्याशी मनमोकळा संवाद साधणे, त्यांच्या भावनिक मानसिक गरजा ओळखून त्या भागवणे असा त्याचा थेट अर्थ होतो. संवाद हे आपल्या भाव-भावनांच्या प्रकटीकरणाचे उत्तम माध्यम असते. संवादातूनच आपल्याला समोरच्या व्यक्तीच्या मनातील नेमके म्हणणे लक्षात येते. परस्परांमधील 'संवाद' हा आपल्या सगळ्यांच्या जगण्यातील महत्त्वाचा घटक असतो. मुख्य म्हणजे,



हा संवाद, आपली मानसिक -भावनिक गरज भागवत असतो; शिवाय आपल्या जगण्यातील उर्मीही वाढवत असतो. आज नेमके याचपासून आपले पालक वंचित राहत आहेत का, याचा विचार करायला हवा.वय वाढत असताना, आपल्या वयस्कर पालकांमध्ये (काही वेळा वाढत्या वयामुळे आलेल्या एकटेपणातून किंवा सामाजिक जीवनापासून लांब राहिल्यामुळे) असुरक्षिततेची भावना निर्माण होत असते. मुलांचा नित्य सहवास व संवाद या दोन गोष्टी मात्र यावर उत्तम मात्रा ठरतात. अर्थातच अशा घोषणा होत असताना, त्या 'दिनविशेष' म्हणून साजऱ्या होण्याची दाट शक्यता असते. जसे महिला दिन, बालक दिन इ. बहुदा उद्या उर्वरित अनेक राज्ये अशा घोषणा करण्यात पुढाकार घेतीलही; पण आपल्या कुटुंबात राहणाऱ्या आपल्याच पालकांकरीता वर्षातील तीन दिवस येथे नक्कीच अपेक्षित नाहीत. अशा घोषणा आपल्याला आपल्या जबाबदाऱ्यांचे भान निर्माण करतात, अशा दृष्टीने याकडे पाहणे आवश्यक आहे. या घोषणेच्या निमित्ताने पालकांना आपल्या सहवासाची, त्यांना गुणवत्तापूर्ण वेळ देण्याची व मुख्य म्हणजे त्यांच्याशी सहज संवादाची गरज असते हे प्रत्येक कुटुंबाला जाणीव करून देईल हे नक्की.

आज घडाळ्याच्या काट्यांवर धावतानाही, अनेक मुले-मुली आपल्या पालकांना, त्यांच्या कामकाजाच्या व्यस्त वेळापत्रकातून वेळ काढून फोन, व्हिडिओ कॉल करून दैनंदिन स्तरावरील संवाद साधताना दिसतात, त्यांची विचारपूस करत असतात. मुख्य म्हणजे, त्यांच्या सर्व हालचालींवर लक्ष ठेवून असतात. त्यांच्या सोईसाठी सुयोग्य व्यवस्थाही लावत असतात. मात्र, हा पाठपुरावा व संवादासह सहवास, त्यांच्या दैनंदिन जीवनातील विविध व्यवहारात सहभाग देणे व त्यांच्यासाठी वेळ राखून ठेवणे या घोषणेमागील हेतू आहे. या निमित्ताने आपणही आपल्या पालकांसाठी व्यस्त वेळापत्रकातून वेळ कसा देऊ शकतो याचा विचार प्राधान्यक्रमाने करण्याची सवय लावून घेतली पाहिजे. परदेशात 'थॅंक्स् गिव्हिंग' दिन/सप्ताह साजरा करण्याची पद्धत आहे. या निमित्ताने पालकांना भेटा, एकमेकांना गुणवत्तापूर्ण वेळ द्या, त्यांचे ऐका, त्यांच्याशी बोला, त्याच्या प्रती विविध पद्धतीने कृतज्ञता व्यक्त करा, असा हेतू या संकल्पनेत असतो. संबंधित देशातील प्रशासनामार्फत या निमित्ताने सुट्ट्या/ वेळांमध्ये शिथिलताही जाहीर केल्या जातात. दैनंदिन जीवनात आपल्या मदत करणाऱ्या सगळ्यांचेच आभार मानायचे असतात. मात्र, 'आई-वडील आपलेच आहेत,' असे म्हणत, त्यांना गृहित धरून दुर्लक्ष करणे अयोग्यच आहे.

खरे तर, आपण त्यांचे आपल्या जडणघडणीतील समर्पण, कष्ट व त्याग याचे स्मरण पदोपदी करणे आवश्यक आहे. मुख्य म्हणजे, भारतीय मानसिकतेतून कुटुंबव्यवस्थेकडे पाहिल्यास, पालक वयस्कर होत असताना, ते मुला-मुलींची जबाबदारी असतात हे विसरून चालणार नाही; त्यामुळे आपल्याला आपल्या पालकांना गुणवत्तापूर्ण वेळ देण्यासाठी असे दिन, घोषणा अथवा निमित्त शोधावी लागतात हे कुटुंबव्यवस्थेच्या दृष्टीने भविष्यकाळातील आव्हानांचे संकेत तर नाहीत ना, याचा विचार गांभीर्याने करणे आवश्यक आहे.नित्यनेमाने पालकांना, देवदर्शन, पर्यटन, करमणूक, सामाजिक कौटुंबिक एकत्रीकरणात घेऊन जाणारे मुले-मुली हे निमित्त साधत त्यांना वेळ, सहवास व त्यांचे म्हणणे ऐकण्यासाठी निमित्त साधत असतात. घरात जमलेली गप्पांची मैफल, एकत्र सणवार-उत्सव साजरे करताना, पालककेंद्रित दृष्टिकोन ठेवत केलेली वर्तणूक रचना या गोष्टी पालकांसाठी गुणवत्तापूर्ण सहवास देण्याची निमित्त असतात. आयुष्याची तिन्हीसांज ही प्रत्येकासाठी थोडे नैराश्य, स्वतःतील एकटेपण व आपली माणसे सोडून जाण्याचे भय निर्माण करणारी असते. या वयाच्या टप्प्यात अनेकदा या व्यक्ती अस्थिर व अस्वस्थ होवू लागतात; त्यामुळे एखाद्या लहान मुलासारखे त्यांचे संगोपन संयम ठेवत करणे आवश्यक असते.वयस्कर पालकांना वेळ देणे हे त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीनेही महत्त्वाचे असते. आपल्याला वेळ देणारी, आपले म्हणणे ऐकणारी आपली मुले आहेत; मुख्य म्हणजे आपण भावी पिढीला हवे आहोत ही भावना या प्रक्रियेतून त्यांच्या आरोग्यवर्धनात मोलाची भूमिका बजावते. कुटुंबातील परस्परांमधील संवादातून स्नेह व एकमेकांच्या गरजा ओळखण्याची प्रक्रिया ही निरंतर चालत राहते.

चला तर मग, या घोषणेच्या निमित्त का होईना, आपणही आपल्या व्यग्रतेची गती थोडी नियंत्रित करत, आपल्या पालकांची अधिक डोळसपणे, गुणवत्तापूर्वक वेळ देत काळजी घेऊ. पालकांच्या डोळ्यांत या सहवासाचा, स्पर्शाचा व समृद्ध संवादाचा आनंद रोज वाचू या.

# जिल्हास्तरीय युवा महोत्सव उत्सवात संपन्न

**जालना | असलम कुरेशी**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग अंतर्गत क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे व युवा कार्यक्रम मंत्रालय भारत सरकार अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद आणि नेहरू युवा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय युवा महोत्सव २०२४-२५ उत्साहात संपन्न झाला.

येथील शासकीय ओद्योगिक प्रशिक्षण संस्थेत आयोजित जिल्हास्तर युवा महोत्सवाचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते पार पडले. यावेळी पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, जिल्हा नियोजन अधिकारी सुनिल सूर्यवंशी, शाहीर रामानंद उगले, जिल्हा क्रीडा अधिकारी संजय गाढवे, जिल्हा युवा अधिकारी प्रणित सांगवीकर प्राचार्य आयटीआय कॉलेज प्राध्यापक डॉ. प्रवीण उखळीकर जिल्हा समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना प्राध्यापक डॉ. सोमीनाथ खाडे क्रीडा अधिकारी



डॉ. रेखा परदेशी, श्रीमती आरती चिल्लारे, क्रीडा मार्गदर्शक सिद्धार्थ कदम, राहुल गायके आदी उपस्थित होते.

या जिल्हास्तरीय महोत्सवांमध्ये समूह लोकनृत्य, समूह लोकगीत, कविता लेखन, कथालेखन, वक्तृत्व स्पर्धा, विज्ञान व तंत्रज्ञान यामधील नव संकल्पना व युथ आयकॉन इत्यादी बाब असून विजयी स्पर्धकांना रोख पारितोषिक प्रमाणपत्र व ट्रॉफी असून यामध्ये प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक काढले आहे.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राहुल गायके, किशोर नावकर, अमर लोंढे, प्रा. शाम चव्हाण, प्रा. सतीश मगरे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख उद्घाटक जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी सर्व स्पर्धकांनी कलाक्षेत्रात आपले नाव उज्वल करावे अशा शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा क्रीडा अधिकारी संजय गाढवे व जिल्हा युवा अधिकारी प्रणित सांगवीकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिलन सावंत यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉक्टर रेखा परदेशी यांनी केले.

जिल्हास्तरीय युवा महोत्सवात विजयी झालेल्या कलाकारांना प्रमाणपत्र व पारितोषिक व रोख रक्कम देण्यात आले. बक्षिस वितरणसाठी प्रा. बसवराज कोरे व शिक्षणाधिकारी श्रीमती मंगल धुपे, संजय गाढवे आदी मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. अंतिम निकाल खालीलप्रमाणे आहे.

१.कला प्रकार, समुह लोकगीत प्रथम-मत्स्योदरी महाविद्यालय, अंबड, ता. अंबड, जि.जालना, द्वितीय- जे.ई.एस.महाविद्यालय, जालना, तृतीय- मॉडर्न कॉलेज घनसावंगी.

कला प्रकार, समुह लोकनृत्य प्रथम- उत्कर्ष थेटर्स डान्स. ग्रुप, जालना, द्वितीय- मत्स्योदरी महाविद्यालय अंबड, तृतीय- मॉडर्न कॉलेज घनसावंगी, कला प्रकार वक्तृत्व स्पर्धा प्रथम-आदिती अरविंद सुरंगळीकर, द्वितीय- धनश्री संजय टेकाळे, तृतीय-सुचित संतोष शिंदे, कला प्रकार वक्तृत्व स्पर्धा प्रथम-आदिती अरविंद सुरंगळीकर, द्वितीय- धनश्री संजय टेकाळे, तृतीय- सुचित संतोष शिंदे, कला प्रकार चित्रकला प्रथम- प्रिया तातेराव दुर्गुळे, द्वितीय- करण मनोहर जगताप, तृतीय-हर्षा युवराज चव्हाण, कला प्रकार कथालेखन प्रथम- शिवप्रसाद अनिल नागवे, द्वितीय- हर्षल प्रविणकुमार उखळीकर, तृतीय- गोपाल उत्तमराव तौर, कला प्रकार कवितालेखन प्रथम- स्वप्नील सोपान खरात, द्वितीय- राहूल महादेव कासोदे, तृतीय-योगेश बाबासाहेब खोसे, कला प्रकार सायन्स. मेला प्रथम- पार्थ उध्दव घुमरे, द्वितीय- कार्तिक ऋषिधर शिंदे, तृतीय- महिमा नितीन भुरेवाल, कला प्रकार सायन्स.मेला प्रथम- आयटीआय कॉलेज जालना सामुहीक, द्वितीय- एमएसएस कॉलेज ऑफ इंजिनिअरींग जालना, तृतीय-एमएसएस कॉलेज ऑफ अंबड.

## लक्ष्मी मुंडे नर्सिंग कॉलेजमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वान दिन संपन्न

**केज | प्रतिनिधी**

केज शहरापासुन जवळच बीड रोडवर असलेल्या लक्ष्मी मुंडे नर्सिंग कॉलेजमध्ये शुक्रवारी सकाळी विश्वरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन करुन त्यांचा ६८ वा महापरिनिर्वाण दिन संपन्न झाला.यावेळी प्राचार्य रवि पवारसर,शिक्षक कर्मचारी आणि विद्यार्थिनी व विद्यार्थी उपस्थित होते.केज शहरापासुन जवळच असलेल्या बीड रोडवरील सिध्दीविनायक शैक्षणिक सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रमाकांत (बापू) मुंडे यांनी सुरु केलेल्या लक्ष्मी मुंडे नर्सिंग कॉलेजमध्ये विश्वरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमीत्त दि.६ डिसेंबर शुक्रवार रोजी सकाळी लक्ष्मी नर्सिंग




कॉलेजचे प्राचार्य रवि पवार सर यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन विनम्र अभिवादन केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचे महत्व सरांनी उपस्थितांना सांगीतले.यावेळी शिक्षक व कर्मचारी सोनवणेताई,विद्यार्थीनी आणि विद्यार्थी उपस्थीत होते.

## अस्पृश्यता आणि विषमतेने ग्रासलेल्या समाजाला समतेची संजीवनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिली-रमेश पोकळे

**बीड | प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना सामाजिक न्याय व समतेवर आधारित समाज रचना अभिप्रेत होती. त्यांनी सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी अस्पृश्यता आणि विषमतेने ग्रासलेल्या समाजाला न्यायाची आणि समतेची संजीवनी प्रदान केली. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा. हा क्रांतिकारी मूलमंत्र त्यांनी समाजाला दिला. असे प्रतिपादन संस्था अध्यक्ष रमेश पोकळे यांनी केले. येथील वसंतराव काळे पत्रकारिता व संगणकशास्त्र महाविद्यालय बीड संभाजी राजे ग्रंथालय व व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालय बीड रा.से.यो.विभागाच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त कार्यक्रमाचे



आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून रमेश पोकळे बोलत होते. या कार्यक्रमाला प्राचार्य बप्पासाहेब हावळे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. पुढे बोलताना रमेश पोकळे म्हणाले की डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे देशाला लाभलेले अनमोल रत्न होते. त्यांनी भारताचे संविधान लिहून सर्व समाजातील लोकांना समान अधिकार प्राप्त करून दिले. त्यांनी भारत देशाच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले कार्य मोलाचे आहे. गुलामगिरीत आणि विषमतेने ग्रासलेल्या संपूर्ण समाजाला न्यायाच्या आणि समतेची नवसंजीवनी प्रदान करून समाजाला नवी दिशा दिली. त्यांनी आपले संपूर्ण जीवन समाजाच्या कल्याणासाठी समर्पित केले. असेही रमेश पोकळे म्हणाले. यावेळी प्र. प्राचार्य बप्पासाहेब हावळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आभार प्रा. सुहास गाढवे यांनी मानले. या कार्यक्रमाला प्रा. राजश्री महाजन, प्रा. शेख, प्रा. फिरोज सय्यद, महेश निवडे दीपक जाधव, इमरान पठाण, सचिन चौरे, सौ.खोसे व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## परळी नगरपालिकेचे कर्तव्यदक्ष कर्मचारी यांच्या सेवानिवृत्ती बद्दल सत्कार समारंभ संपन्न

**परळी | प्रतिनिधी**

परळी नगरपालिकेचे कर्तव्यदक्ष कर्मचारी यांच्या सेवानिवृत्ती बद्दल त्यांचा हृदय सत्कार करण्यात आला असल्याची माहिती प्रसिद्धीपत्रकाद्वारे देण्यात आली आहे. याबाबत सविस्तर माहिती असे की परळी नगरपालिकेतील कर्मचारी श्री नामदेव साळवे श्री विलास केदारे व श्री अनिल गोदाम हे एकाच दिवशी सेवानिवृत्त झाले असून त्यांचा हृदय सत्कार परळी नगरपालिकेचे उपमुख्य अधिकारी श्री संतोष रोडे साहेब परळी नगरपालिकेचे स्वच्छता निरीक्षक शंकरराव साळवे साप्ताहिक मानपत्रचे संपादक बालासाहेब जगतकर यांच्यासह वैजनाथ भाऊ सावंत उत्तम समुद्रे सुरेश घाडगे वसंत बनसोडे विजय



गायकवाड अशोक जगतकर राहुल जगतकर सुरेश वाल्मिकी अरविंद बनसोडे बाळासाहेब गीते व आबा यांच्यासह अनेक कर्मचारी व मित्रपरिवाराच्यावतीने हृदय सत्कार करण्यात करण्यात आला असून त्यांच्या पुढील वाटचालीस व दीर्घायुष्य वाढण्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या असल्याची माहिती ही प्रसिद्धी पत्रकार द्वारे देण्यात आली आहे.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आयुष्यभर वंचितांना न्याय मिळवून देण्यासाठी संघर्ष केला-अँड.मनोज संकाये

### महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना केले अभिवादन!

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

भारतीय लोकशाही ही जगातील सर्वात मोठी लोकशाही असून या लोकशाहीमध्ये दिनदलित आणि वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अहोरात्र संघर्ष करून न्याय मिळवून देण्याचे महान कार्य केले असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते अँड.मनोज संकाये यांनी केले. परळी येथील रेल्वे स्टेशन परिसरातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास हार अर्पण करून त्यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांच्या मित्र मंडळाच्या वतीने अभिवादन केले.

यावेळी बाबासाहेब मुंडे, मुंजाभाऊ साठे, मकरंद नरवणे, संतोष चौधरी, प्रवीण रोडे, शिरीष सलगरे, संतोष कांबळे, वसंत मुंडे, जयसिंग रोडे, धनराज रोडे, बाळू मुंडे, बालासाहेब मुंडे, गोविंद कांदे, वैजनाथ कांदे आदी मित्र मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.



# हेळंब येथे खंडोबा यात्रेस आज पासुन सुरुवात


## पालखी सोहळा, वाघ्या मुरळी, कुस्त्यांची दंगल होणार

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

तालुक्यातील हेळंब येथे ०७ ते ०९ डिसेंबर दरम्यान ग्रामदैवत श्री खंडोबा यात्रा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या निमित्त शनिवारी दुपारी १ वा. श्री खंडोबाची पालखी मिरवणुक निघणार आहे. रात्री ११ वाजता शोभेची दारु उडवून अतिषबाजी केली जाणार आहे व २१ तोफांची सलामी दिली जाणार आहे. रविवारी रात्री ८ ते १२ दरम्यान वाग्या मुरळीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. सोमवार दि.०९ डिसेंबर रोजी दुपारी २ वाजता जंगी कुस्त्याचा कार्यक्रम होणार आहेत. जंगी कुस्त्यासाठी प्रथम पारितोषिक २१,१०१/- ठेवण्यात आले आहे.

हेळंब येथे जागृत असे खंडोबाचे मंदिर आहे. चंपाषष्ठी निमित्त हेळंब येथे शनिवार पासुन तीन दिवशीय यात्रेस प्रारंभ होत आहे. यात्रेची तयारी जय्यत करण्यात आली आहे. विविध खेळणी साहित्याचे दुकाने गावात थाटण्यात आली आहे. शनिवारी राज्याच्या कानाकोपर्यातुन खंडोबाच्या दर्शनासाठी हेळंब मध्ये पन्नास हजारच्यावर भाविक दाखल होणार आहेत.

नवस केला की, पावतो अशी श्रद्धा आहे. त्यामुळे भाविक नवस बोलतात फळ मिळाल्यास ते नवस पूर्ण करतात. यासाठी पंचक्रोशीतील व ग्रामस्थ कितीही बाहेर असले तरी यात्रेनिमित्त ते दर्शनासाठी आवर्जून येतात.



मुंबई, पुणे, छत्रपती संभजीनगर, हैदराबाद आणि अनेक राज्यातून भाविक दर्शनासाठी येतात.

खंडोबा मंदिर हे जागृत देवस्थान आहे. चंपाषष्ठीला तीन दिवशीय यात्रा भरते, शनिवारी हेळंब येथील श्री हनुमान मंदिरापासुन श्री खंडेरायाच्या मुर्तीची मिरवणुक वाजत गाजत निघते, एक किलोमिटर अंतरावर असलेल्या खंडोबा मंदिरात ही पालखी येते, पुन्हा ही पालखी गावातुन जाते. या पालखी सोहळ्यात हेळंब व परिसरातील ग्रामस्थ उत्साहाने सहभागी होतात. रविवारी सायंकाळी हेळंब येथे वाघ्या मुरळ्याचा कार्यक्रम घेण्यात येतो व सोमवारी कुस्त्याच्या स्पर्धा आयोजीत करण्यात आल्या आहेत. तीन दिवशीय यात्रेत परळी तालुक्यातील राज्यातील अनेक ठिकाणाहुन भक्त सहभागी होतात व खंडोबाचे मनोभावे दर्शन घेतात. या यात्रेची ग्रामस्थांनी जोरदार तयारी केली आहे. तीन दिवसीय यात्रेत दर्शनासाठी परळी वैजनाथ व परिसरातील ग्रामीण भागातुन भक्त मोठ्या प्रमाणात येतात. हेळंबच्या गावकरी मंडळाच्या वतीने भव्य यात्रा महोत्सव आयोजित करण्यात येतो.

श्री खंडोबा मंदिर हे भव्य दिव्य आहे. खंडोबा मंदिरात प्राचीन काळापासून यात्रा भरते. मंदिरात लक्षवेधी व आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात येते. या यात्रेची ग्रामस्थांनी जोरदार तयारी केली आहे. दिवसभर मंदिर परिसरात गावातील व परिसरातील भाविक तळीभांडार उचलणे, ओटी भरणे, भंडारा खोबरे उधळणं आदि कार्यक्रमास सुरुवात करतात व रात्री १० वाजता श्रींचा अश्वरूपी मूर्तीसह सवाद्य छबिना मिरवणूक काढून मंदिराला प्रदक्षिणा घालण्यात येते. यावेळी हलगीच्या तालावर खंडोबाचे वारू शिव मल्हार येळकोट. येळकोट घे च्या जय जयकारात बेभान होऊन नाचतात हे विलोभनीय दृश्य पाहण्यासाठी पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहतात.

## चौसाळा येथे महापरिनिर्वाण दिना निमित्त महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन



**चौसाळा | प्रतिनिधी**

विश्वरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त बीड तालुक्यातील चौसाळा शहरातील भीम नगर येथील बौध्दविहारात व चौसाळा ग्रामपंचायत कार्यालयात अभिवादन करण्यात आले यावेळी चौसाळा ग्रामपंचायतचे उपसरपंच अंकुश (आण्णा)कळासे, बापु चव्हाण,सतीष(भाऊ) जोगदंड,ग्रामपंचायत सदस्य किशोर ढोकणे,चौसाळा पत्रकार संघाचे अध्यक्ष विवेक कुचेकर, ग्रामपंचायत सदस्य बाबासाहेब जाधव,युवा नेते पजांब वाघमारे,ग्रामपंचायत सदस्य सुरज सोनवणे,विलास लगाडे,बबन पवार,बबन जावळे,श्रीकांत शिंदे,अमोल जावळे , ग्रामंचायत कर्मचारी ईसाक भाई, भैय्या पवार यांच्यासह अनेक भिमसैनिक मोठया संख्येने उपस्थीत होते.

## भगवान विद्यालयात भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनी अभिवादन

**बीड | प्रतिनिधी**

बीड शहरातील नामांकित भगवान विद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक मुसा शेख होते. पर्यवेक्षक अंकुश आघाव, गर्जे, ढोकर, डोळे, एन.एम. जाधव यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले.

एस.आर. वडमारे यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याचा गौरव करत महापरिनिर्वाण दिनाचे महत्त्व विशद केले. अध्यक्षीय समारोपात शेख यांनी शिका, संघटित व्हा, संघर्ष करा या डॉ. आंबेडकरांच्या त्रिसूत्रीचा उल्लेख करत मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पवार यांनी केले, तर उपस्थितांचे आभार डी.पी. डोळे यांनी मानले. या प्रसंगी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सामूहिक प्रार्थनेनंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

# परळीचे डॉ.रविंद्र जगतकर यांना जिल्हास्तरीय आदर्श आरोग्य सेवक सेवारत्न पुरस्कार जाहीर ; मित्र परिवाराकडून अभिनंदन

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

ठाणे व रायगड जिल्ह्याचे वरिष्ठ जिल्हा समन्वयक तथा परळी शहरातील जगतकर गल्ली येथील भूमिपुत्र डॉ.रविंद्र प्रकाश जगतकर यांना द युवा ग्रामीण पत्रकार संघ कोल्हापूर जिल्हा मार्फत दिला जाणार जिल्हास्तरीय आदर्श आरोग्यसेवक सेवारत्न पुरस्कार २०२४ देऊन गौरविण्यात येणार आहे. अशी माहिती द युवा ग्रामीण पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष तथा पत्रकार सागर शेळके यांनी एका पत्राद्वारे प्राप्त झाली आहे. त्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून मान्यवर, मित्रपरिवार व नातेवाईकांकडून स्वागत व अभिनंदन होत.



द युवा ग्रामीण पत्रकार संघ कोल्हापूर जिल्हा आयोजित विशेष शानदार पुरस्कार वितरण सोहळ्यात विविध क्षेत्रातील कर्तबगार व्यक्तींचा, राजकीय, सामाजिक,संस्थांचा पुरस्कार देऊन दिग्गज मान्यवरांच्या शुभहस्ते गौरव करण्यात येणार आहे. यामध्ये विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तिमत्वास त्यांनी केलेल्या सातत्यपूर्ण कार्याची दखल घेऊन त्यांना पुढील वाटचालीसाठी प्रेरित करून त्यांच्या कार्यास बळ देण्याच्या विधायक उद्देशाने कर्तृत्ववान व्यक्तींना हा मानाचा पुरस्कार देण्यात येतो. यावेळी सामाजिक, आरोग्य क्षेत्रात आपल्या कार्यशैलीचा आगळा-वेगळा ठसा उमटविणाऱ्या, ठाणे व रायगड जिल्ह्याचे वरिष्ठ जिल्हा समन्वयक तथा परळी वैद्यनाथ शहरातील जगतकर गल्ली येथील भूमिपुत्र डॉ.रविंद्र प्रकाश जगतकर यांनी सामाजिक बांधिलकीतून आरोग्यसेवक म्हणून वैद्यकीय क्षेत्रात मागील अनेक वर्षांपासून रूग्णसेवा हीच ईश्वर सेवा मानत कार्य करत आहेत.आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतीराव फूले जण आरोग्य योजनेचा ३४ हजार पेक्षा नागरिकांना लाभ मिळवून दिला आहे. गेली १० वर्ष वैद्यकीय सेवा केलेली आहे. रूग्णसेवा करणं हे डॉक्टरांचे कर्तव्य आहे. परंतु एक माणूस म्हणून सुद्धा त्यांनी चांगले काम या भागात उभारले आहे. कोरोनाच्या काळात असंख्य गोर-गरीबांना व सर्वसामान्यांना मदतिचा हात दिला आहे. वैद्यकीय सेवेत असताना अनेक रुग्णानाचे जीव वाचविण्यासाठी केलेला प्रयत्न हा माणूसकीचे दर्शन घडवितो. सामाजिक, वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करुन कामगिरी केली आहे. त्याच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन द युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या वतीने दिला जाणारा जिल्हास्तरीय आदर्श आरोग्यसेवक सेवारत्न पुरस्कार जाहिर झाला आहे .

यावेळी डॉ.रविंद्र जगतकर म्हणाले की, मिळालेला पुरस्कार माझी सामाजीक जबाबदारी व काम करण्याची नैतिक जबाबदारी वाढवीत आहे तसेच ते माझा उत्साह वाढवीत मला सकारात्मक ऊर्जा देत माझी प्रेरणा वाढवीत असल्याचे मत त्यांनी. आमच्या प्रतिनिधीशी बोलतांना व्यक्त केले. या पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल डॉ.रविंद्र जगतकर यांचे सामाजिक, वैद्यकीय व सर्व क्षेत्रातील मान्यवर, मित्र परिवार व नातेवाईकांकडून स्वागत व अभिनंदन होत आहे.

**विविध पुरस्काराने सन्मानित**

निर्वाण फाऊंडेशन नाशिकच्या वतीने सावित्रीज्योती सन्मान पुरस्काराने सन्मानीत -राज्यस्तरीय, समाजभुषण पुरस्काराने सन्मानीत श्रीनाथ मानव सेवा मंडळ राज्यस्तरीय, कार्यगौरव पुरस्काराने सन्मानीत तक्षशिला बहुउद्देशिय सेवाभावी संस्था व साप्ताहीक मानपत्र.,परळी वैजनाथ, सु-लक्ष्मी बहुद्देशिय सेवाभावी संस्था व माणुसकी रुग्णसेवा समूह यांच्या वतीने दिला जाणारा सेवागौरव राज्यस्तरीय पुरस्कार सन्मानित, आरोग्य विभागात उल्लेखनिय कामगिरीबद्दल राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दिपक केसरकर यांच्या भारतीय प्रजासताक दिनानिमित्त सन्मानित, उत्कृष्ट कामगिरीसाठी सन्मानीत राज्य शासन आरोग्य हमी सोसायटी., उत्कृष्ट कामगिरीसाठी सन्मानीत जिल्हा आरोग्य विभाग, उत्कृष्ट कामगिरीसाठी सत्कार आयुष्यमान भव अभियाना कार्यक्रमा अंतर्गत, एकात्मिक आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे आणि महात्मा ज्योतीराव, फुले जन आरोग्य योजना अंतर्गत उल्लेखनीय कामगिरीसाठी सन्मानीत, सर्टिफिकेट ऑफ पार्टीसिपशन (स्टेट लेव्हल कॉंक्लावे , मुंबई ) तसेच यापूर्वी ही त्यांनी केलेल्या वैद्यकीय क्षेत्रातील कार्यामुळे बऱ्याच राज्यस्तरीय पुरस्कारांनी सन्मानीत झालेले आहेत.

### केज रोटरीचा अनोखा उपक्रम

# वाहनांना रिफ्लेक्टर लावून केली जनजागृती

**केज । प्रतिनिधी**

केज शहरात व परिसरात रिफ्लेक्टर नसलेल्या वाहनांना रिफ्लेक्टर लावण्याचा उपक्रम रोटरी क्लब ऑफ केज च्या वतीने राबवण्यात आला. यावेळी शंभरहून अधिक वाहनांना रिफ्लेक्टर लावण्यात आले.




केज तालुका व परिसरातील असंख्य वाहनांच्या पाठीमागील बाजूस रिफ्लेक्टर नसल्याने अशा वाहनांची स्थिती किंवा गती लक्षात न आल्याने या वाहनाला पाठिमागील बाजूस धडक दिल्याने अनेक नागरिकांना आपला जीव गमवावा लागलेला आहे. ही परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर बनल्याने याबाबत वाहनधारक, वाहनचालक व नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी रोटरी क्लब ऑफ केज च्या वतीने दरवर्षी मुख्य महामार्गावर जनजागृती करून 'रिफ्लेक्टर जागृती अभियान राबवले जाते.

याही वर्षी केज रोटरीच्या वतीने श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक व भवानी चौक (धारूर चौक) येथे ६ डिसेंबर रोजी सकाळी रिफ्लेक्टर अभियान राबविण्यात आले.

याशिवाय केज विकास संघर्ष समितीच्या वतीने केज तालुका तहसीलदार व पोलीस स्टेशन यांना निवेदन देऊन रिफ्लेक्टर नसलेल्या वाहनावर कठोर कार्यवाही करावी. केज तालुका व परिसरातील साखर कारखाना प्रशासनाला विशेष पत्र लिहून त्यांच्या कक्षेत ऊसवाहतुकीचे काम करणाऱ्या सर्व बैलगाड्या आणि वाहनांना पाठीमागून रिफ्लेक्टर फलक किंवा रिफ्लेक्टर पेपर्स स्टिकर्स सक्तीचे करावेत अशी मागणीही करण्यात आली आहे. प्रशासनाने कार्यवाही न केल्यास जनतेच्या सहभागाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा केज विकास संघर्ष समितीने दिला आहे.

या उपक्रमात केज रोटरीचे अध्यक्ष प्रकाश कामाजी, सचिव अनंत तरकसबंद, प्रोजेक्ट चेअरमन असरार कुरेशी, को-चेअरमन बापुराव सिंगण, हनुमंत भोसले, सूर्यकांत चवरे, दादा जमाले पाटील, अरुण अंजाण, विजय जॅकेटिया इत्यादी रोटरी सदस्य व नागरिक सहभागी होते.

## महाराष्ट्र विद्यालय संकुलात महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन



**परळी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शिक्षण संस्था मोहा, संचलित महाराष्ट्र प्राथमिक, माध्यमिक व उच्च विद्यालयात भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त भारतरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर

यांचा महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला.

या अभिवादन कार्यक्रम प्रसंगी संस्थेचे जेष्ठ संचालक सुदाम शिंदे, शालेय संकुलाचे प्राचार्य/ मुख्याध्यापक मुरलीधर बोराडे, उप मुख्याध्यापक सुरेंद्र हरदास, पर्यवेक्षक केशव दीक्षित, उच्च माध्यमिक विभाग प्रमुख शेख सर यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या अभिवादन कार्यक्रम प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेले कॉ.सुदाम शिंदे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्याला उजाळा देत त्यांचे अनुकरण आजच्या युवा पिढीने करणे अत्यावश्यक असल्याचे महत्व विषद केले.या प्रसंगी उच्च माध्य विभागाचे प्रा.विशाल देशमुख यांनी आपले विचार व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्र संचलन मराठी विभागाचे ब्रम्हानंद देशमुख, प्रास्तविक बनसोडे सर तर आभार व्यक्त विभाग प्रमुख अर्जुन राठोड यांनी केले.या कार्यक्रमास महाराष्ट्र प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील मधील सर्व शिक्षक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# जिल्हास्तरीय युवा महोत्सव उत्सवात संपन्न

**जालना । असलम कुरेशी**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग अंतर्गत क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे व युवा कार्यक्रम मंत्रालय भारत सरकार अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद आणि नेहरू युवा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय युवा महोत्सव २०२४-२५ उत्साहात संपन्न झाला. येथील शासकीय ओद्योगिक प्रशिक्षण संस्थेत आयोजित जिल्हास्तर युवा महोत्सवाचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते पार पडले. यावेळी पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, जिल्हा नियोजन अधिकारी सुनिल सूर्यवंशी, शाहीर रामानंद उगले, जिल्हा क्रीडा अधिकारी संजय गाढवे, जिल्हा युवा अधिकारी प्रणित सांगवीकर प्राचार्य आयटीआय कॉलेज प्राध्यापक डॉ. प्रवीण उखळीकर जिल्हा समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना प्राध्यापक डॉ. सोमीनाथ खाडे क्रीडा अधिकारी डॉ. रेखा परदेशी, श्रीमती आरती चिल्लारे, क्रीडा मार्गदर्शक सिद्धार्थ कदम, राहुल गायके आदी उपस्थित होते. या जिल्हास्तरीय महोत्सवांमध्ये समूह लोकनृत्य, समूह लोकगीत, कविता लेखन, कथालेखन, वक्तृत्व स्पर्धा, विज्ञान व तंत्रज्ञान यामधील नव संकल्पना व युथ आयकॉन इत्यादी बाब असून विजयी स्पर्धकांना रोख पारितोषिक प्रमाणपत्र व ट्रॉफी असून यामध्ये प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक काढले आहे. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राहुल गायके, किशोर नावकर, अमर लोंढे, प्रा. शाम चव्हाण, प्रा. सतीश मगरे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख उद्घाटक जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी सर्व स्पर्धकांनी कलाक्षेत्रात आपले नाव उज्वल करावे अशा शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा क्रीडा अधिकारी संजय गाढवे व जिल्हा युवा अधिकारी प्रणित सांगवीकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिलन सावंत यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉक्टर रेखा परदेशी यांनी केले. जिल्हास्तरीय युवा महोत्सवात



विजयी झालेल्या कलाकारांना प्रमाणपत्र व पारितोषिक व रोख रक्कम देण्यात आले. बक्षिस वितरणसाठी प्रा. बसवराज कोरे व शिक्षणाधिकारी श्रीमती मंगल धुपे, संजय गाढवे आदी मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. अंतिम निकाल खालीलप्रमाणे आहे. १.कला प्रकार, समुह लोकगीत प्रथम-मत्स्योदरी महाविद्यालय, अंबड, ता. अंबड, जि.जालना, द्वितीय- जे.ई.एस.महाविद्यालय, जालना, तृतीय- मॉडर्न कॉलेज घनसावंगी. कला प्रकार, समुह लोकनृत्य प्रथम- उत्कर्ष थेटर्स डान्स ग्रुप, जालना, द्वितीय- मत्स्योदरी महाविद्यालय अंबड, तृतीय- मॉडर्न कॉलेज घनसावंगी, कला प्रकार वक्तृत्व स्पर्धा प्रथम- आदिती अरविंद सुरंगळीकर, द्वितीय- धनश्री संजय टेकाळे, तृतीय-सुचित संतोष शिंदे, कला प्रकार वक्तृत्व स्पर्धा प्रथम-आदिती अरविंद सुरंगळीकर, द्वितीय- धनश्री संजय टेकाळे, तृतीय-सुचित संतोष शिंदे, कला प्रकार चित्रकला प्रथम-प्रिया तातेराव दुर्गुळे, द्वितीय- करण मनोहर जगताप, तृतीय-हर्षा युवराज चव्हाण, कला प्रकार कथालेखन प्रथम- शिवप्रसाद अनिल नागवे, द्वितीय- हर्षल प्रविणकुमार उखळीकर, तृतीय-गोपाल उत्तमराव तौर, कला प्रकार कवितालेखन प्रथम- स्वप्नील सोपान खरात, द्वितीय- राहूल महादेव कासोदे, तृतीय-योगेश बाबासाहेब खोसे, कला प्रकार सायन्स मेला प्रथम- पार्थ उध्दव घुमरे, द्वितीय- कार्तिक ऋषिधर शिंदे, तृतीय-महिमा नितीन भुरेवाल, कला प्रकार सायन्स मेला प्रथम- आयटीआय कॉलेज जालना सामुहीक, द्वितीय- एमएसएस कॉलेज ऑफ इंजिनिअरींग जालना, तृतीय-एमएसएस कॉलेज ऑफ अंबड.

# महामानवास अभिवादन मुक्यानां बोलते करणारे

## डॉ बाबासाहेब आंबेडकर-केंद्र प्रमुख लक्ष्मण उबाळे




**मांजरी । प्रतिनिधी**

मांजरी(माहुली) येथे केंद्रीय प्राथमिक शाळा येथे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापिनिर्वाण दिनानिमित्ताने अभिवादन करण्यात आले या प्रसंगी शालेय विद्यार्थ्यांचे भाषणे झाली,या प्रसंगी प्राचार्य संजय तुपे यांनी आपले मनोगत व्यक्त केले,केंद्रप्रमुख लक्ष्मण उबाळे यांनी आपल्या भाषणात सांगितले की मानवाला माणूस म्हणण्याचा अधिकार प्राप्त करून देण्याचा समानतेचा अधिकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिला,यप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक ठाकरे सर, आळंदकर सर गोसे सर सोनावणे सर,सेंट मेरी हायस्कूल के मुख्याध्यापक बनसोडे सर,राहुल जाधव,शेख सर,अमित अल्हाट,केंद्र अंतर्गत सर्व शिक्षक वृंद विद्यार्थी उपस्थित होते

## महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन

**सिल्लोड । प्रतिनिधी**

येथे दलितमित्र गयाबाई साबळे प्रतिष्ठान, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे युवा मंच तर्फे भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. युवा मंचचे प्रवक्ते प्रा अनिल साबळेयांच्या अध्यक्षतेखाली अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे ग्रंथालय येथे अभिवादन करण्यात आले.प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी संचालक डॉ. सचिन साबळे, किशोर जाधव, प्रा. अनिल साबळे, विशाल मिसाळ, गजानन आव्हाड,भगवान राऊत,संकेत पवार, प्रशांत साबळे, गजानन आव्हाड, मंगेश जाधव, सोमनाथ सोनावणे, विश्वजीत साबळे, यांच्यासह स्नेहल साबळे, कमलबाई आव्हाड,अंजली साबळे, प्रियांका सोनवणे, माहेश्वरी साबळे,लताबाई सोनवणे, मंगलबाई गायकवाड प्रीती साबळे , संगीता आव्हाड,श्रुती साबळे,आदी उपस्थित होते.

# गंगापूर येथे बुद्धीच्या सागरास मानवंदना



**गंगापूर । प्रा संजय तुपे**

मॉडर्न इंटरनॅशनल स्कूल सीबीएससी गंगापूर येथे महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८व्या महापरिनिर्वाणदिना निमित्त अभिवादन करण्यात आले याप्रसंगी शाळेच्या संचालिका मार्गदर्शिका श्रीमती बिंदू मॅडम, प्राचार्या श्रीमती कविता गवते,शाळेचे कॉर्डिनेटर प्रा संजय तुपे शिक्षक वृंद व विद्यार्थी हे उपस्थित होते, विद्यार्थी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या वेशभूषा करून आले होते,कार्यक्रम प्रसंगी तुपे सरांचे मार्गदर्शन पर भाषण झाले त्यांच्यासमोर आवाजात त्यांनी बाबासाहेबांच्या जीवनावरील एक गीत सादर केले, त्याचबरोबर विद्यार्थ्यांचे भाषण झाले व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली,

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077